# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०४/०८/१७
## दि.०३/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ३६६/१७,भादविक ४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | शशीकांत बिहाणी,वय-७०,रा.शनिवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | १.आर.एस.पंडीत व एक महिला मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०२/१७ ते दि.१०/०३/१७ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद इसम व महिला यांनी आपसात संगनमत करून,एक खाजगी बँकेतुन ज्यादा परतावा देण्याचे अमिष दाखवुन,फिर्यादी यांचेकडुन फोनव्दारे वेळोवेळी संपर्क साधुन ४ लाख ५० हजार रूपये एनएफटीव्दारे वेग-वेगळया बँकेचे खात्यावर भरावयास भाग पाडुन,फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अमृत मराठे ७३५०००२३११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २८३/१७,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | अरूण दातीर,वय-६४,रा.वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०८/१७ रोजी दु.१२/३० वा. आर.टी.ओ चौक येथील एसएसपीएमएस कॉलेजचे मेनगेटचे बाहेर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना साधु वेशातील दोन अनोळखी इसमांनी तम्हाला साई बाबा प्रसन्न होतील असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करून,फिर्यादी यांचेकडील ३० हजार रू किची एक सोन्याची अंगठी तोंडात टाकुन घेवुन जावुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन व्हि बैसाणे ९९२२९९३१११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २५६/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | राजेंद्र वेळापुरे,वय-५५,रा.खेड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० ते ५/०० वा. चे दरम्यान विभागीय कार्यशाळा शंकरशेठ रोड,स्वारगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,विभागीय कार्यशाळा शंकरशेठ रोड,स्वारगेट,पुणे येथे शिवनेरी बस उभी असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने शिवनेरी बस मधील ३०,०००/- रु किचे दोन ए.सी. कप कमांडरचे लोखंडी पार्ट चोरी करून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गुरव ९९२३७९४३४६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चिंचवड पो स्टे २०३/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | अमर शिराम,वय-३८,रा.चिचंवड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०७/१७ रोजी जुना जकात नाका चिंचवड,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी जुलै महिन्याचे पहिल्या आठवडयात जॉब पोर्टल वेबसाईटवर ऑनलाईन पैसे भरून नोकरी मिळविण्यासाठी नोंदणी केली होती. त्यानंतर नमुद वेळी फिर्यादी यांचे मोबाईलवर एका अज्ञात मोबाईलधारकोन फोन करून त्यांना कंपनीतुन बोलत आहे,तुम्ही नोंदणीसाठी भरलेले २,७००/- रूपये परत करणार आहे असे फिर्यादी यांना सांगुन त्यांचे डेबीट कार्डावरील गोपनीय माहिती विचारून फिर्यादी यांचे खात्यावरील एकुण ६१,०५०/- रूपये ऑनलाईन माध्यमाव्दारे काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विनायक साळुंखे ९८२३४१९९७० |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६६५/१७,भादविक ४२०,४०६,४०९ |
| **फिर्यादी** | भालचंद्र डोंगळीकर,वय-५९ वर्षे,रा.आनंद पार्क,औंध गाव,पुणे |
| **आरोपी** | मे.यशोदीप स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत लातुरचे अध्यक्ष-दत्तात्रय ऊर्फ दत्तोबा नागोबा ऊर्फ मोहनाळकर ऊर्फ कुलकर्णी व इतर पदाधिकारी |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन-२००८ ते सन-२०१४ रोजीचे कालावधीत प्रादेशिक मनोरूग्नालय येरवडा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे प्रादेशिक मनोरूग्नालय,येरवडा,पुणे येथे प्रभारी अधिक्षक म्हणुन काम पाहत आहेत. मे.यशोदीप स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत,लातुर या संस्था यांनी प्रत्येक कामगाराच्या पीएफ खात्यावर दरमहा जमा करण्याची संपुर्ण जबाबदारी ही सदर संस्थेची व तीचे असणारे अध्यक्ष व पदाधिकरी यांची असताना, त्यांनी प्रादेशिक मनो रूग्णालयातील स्वच्छता करण्याच्या कामाची ठेक्यांची संपुर्ण रक्कम प्रादेशिक मनोरूग्णालय येरवडा,पुणे यांचेकडून स्वीकारून एकुण ७८ कामगारांना देय असलेला भविष्य निर्वाह निधीची रक्कम ६१,०३९६२/- रूपये त्यांना देय असतांना,सदर रकमेतुन कामगारांचा पगार व भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांचे खात्यावर जमा न करता,स्वतःचे अर्थिक फायद्या करीता वापरून,प्रादेशिक मनोरूग्णालय,येरवडा,पुणेची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी व्हि देशमुख ९५५२११०१०० |

**<u>दि.०४/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २८४/१७,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१२८/१७७,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अतिश दांडगे,वय-२१,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | एक विधीसंघर्षीत बालक,वय-१७,रा.उजवी भुसारी कॉलनी,कोथरूड,पुणे (ताब्यात नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०७/१७ रोजी २०/०० वा. गणेश कृपा सोसायटी समोर डी पी रोड कोथरूड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे आजोबा उत्तम महादेव दांडगे,वय-७५,रा.शिवतारा गार्डन,धनंजय सोसा. कोथरूड,पुणे यांना नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दत्तात्रय वणवे ९६८९९२९५९८ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ४५२/१७,भादविक ३०२,२०१,३७६(२)( I),बाल लैंगिक अत्याचार व लैंगिक गुन्हयापासुन बालकांचे संरक्षण का. २०१२ चे क.५(एल) ६ |
| **फिर्यादी** | रामदास मुंढे,सहा.पो.निरी.पिंपरी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | फिरोज हमीद शेख,वय-३७,रा.के-५,संत कबीर सोसा. मिलींदनगर पिंपरी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०८/१७ रोजीच्या तीन ते चार दिवसापुर्वी पिंपरी भाजी मंडई गाळा नं.४५,पिंपरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम फिरोज हमीद शेख याचे यातील पिडीत अल्पवयीन मुलगी,वय-१६,रा. |

आदर्शनगर,पिंपरी,पुणे हीचेबरोबर बोलत असल्याचे,फिरोज शेख याचे घरच्यांना व समाजाला सांगुन त्याची बदनामी करण्याची वारंवार धमकी देवुन त्याचेकडुन वारंवार पैसे घेत असल्याचा राग मनात धरून सदर इसमाने पिडीत मुलीस नमुद ठिकाणी बोलावुन तीचा दोरीने आवळुन तीला जीवे ठार मारून तीचा मृतदेह पिंपरी भाजी मंडई गाळा नं.४५ या गाळयातच खड्डा करून पुरून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) विवेश मुगळीकर ९८२३०२९७३९

**३**

**पो.स्टे.गुरनं./कलम** बिबवेवाडी पो स्टे २३३/१७,भादविक ३०७,३२३,५०४,३४,आर्म ॲक्ट ४(२५)

**फिर्यादी** सनी संतोष भरगुडे,वय-१९,रा.बिबवेवाडी,पुणे

**आरोपी** १.शाम उर्फ स्वप्निल बिबवे २.सौरभ सरकाळे व इतर दोन,सर्व रा.बिबवेवाडी,पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०८/१७ रोजी सकाळी ११/२० वा.विठ्ठल मंदिरा जवळ बिबवेवाडी गावठाण,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह विठ्ठल मंदिरा जवळ थांबले असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना तु खुप माजला आहेस,तुला आज संपवुनच टाकतो असे म्हणुन कोयत्याने व तलवारीने फिर्यादी यांचे डोक्यात व हातावर वार करून,इतर साथीदारांनी शिवीगाळ व लाथ-बुक्क्यांनी मारहाण करून फिर्यादी यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. जे.आर.जाधव ९७३०५१८४८३

**दि.०३/०८/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता**

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | बंडगार्डन | भादविक ४५४,४५७,३८० | जफर शाहजहान इराणी | ३८ |
| २ | बंडगार्डन | भादविक ४५४,४५७,३८० | अहमद रमाजन पठाण | ३५ |
| ३ | येरवडा | भादविक ३६३,३६६(अ),३७६,३४ | शकील शब्बीर शेख | १९ |
| ४ | येरवडा | भादविक ३७६,३१३,५०४,३४ | अणु साहिल धोत्रे | १९ |
| ५ | समर्थ | भादविक ४२०,४६५,४६८,४७१,३४ | निळु बबरूवान डिगोळे | २५ |
| ६ | चतुःश्रृंगी | भादविक २७९,३०४(अ) | दिनेश सुरेश सोनवणे | २६ |
| ७ | चतुःश्रृंगी | भादविक २७९,३३८,३०४(अ) | करण मुकुंद मकवाना | ३२ |
| ८ | हिंजवडी | भादविक ३८०,३४ | रविकरिण माताबदल शदव | २१ |
| ९ | हिंजवडी | भादविक ३८०,३४ | मयत भोलानाथ जयस्वाल | १९ |
| १० | हडपसर | भादविक ४५४,४५७,३८० | उमेश विष्णु कदम | २९ |
| ११ | सहकारनगर | भादविक ४५४,३८० | ऋषीकेश संजय लोंढे | १९ |
| १२ | उत्तमनगर | भादविक ३७६,३५४(ब),४२७,५०४,३४ | अमोल गोपाळ बनसोडे | २१ |
| १३ | उत्तमनगर | भादविक ३७६,३५४(ब),४२७,५०४,३४ | बालाजी अंबादास कांबळे | २८ |
| १४ | उत्तमनगर | भादविक ३७६,३५४(ब),४२७,५०४,३४ | केशव दशरथ शेटे | ३४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**